
# पुणे महानगरपालिका
# सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक




# सन २०२१-२२ च्या प्रमुख उपलब्धी आणि ठळक बाबी (१/५)

स्वच्छ सर्वेक्षण २०२१ स्पर्धेमध्ये १० लाखाहुन अधिक लोकसंख्येच्या श्रेणीत पुणे शहराचा भारतात ५ वा क्रमांक आणि महाराष्ट्रात २ रा क्रमांक प्राप्त




पुणे शहराला कचरा मुक्त शहर अंतर्गत ३ स्टार मानांकन, ODF++प्रमाणपत्र व बेस्ट सेल्फ सस्टेनेबल बिग सिटीचा देशातील प्रथम क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त

भारत सरकारच्या गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय यांचे “इज ऑफ लिव्हिंग इंडेक्स २०२०” मध्ये पुण्याला दुसरा क्रमांक प्राप्त झालेला आहे. तसेच Municipal Performance Index 2020 साठी भारतामध्ये पाचवा क्रमांक प्राप्त झाला



# सन २०२१-२२ च्या प्रमुख उपलब्धी आणि ठळक बाबी (२/५)

पुणेकरांसाठी पाणीवापर सांगणारे स्मार्ट AMR वॉटर मिटर्स मोठ्या प्रमाणात बसविणारी देशातील पहिली महापालिका

पर्वती येथे नव्याने उभारलेल्या आधुनिक जलशुद्धीकरण केंद्र मधील तंत्रज्ञानाचा अत्याधुनिक बॅकवॉश प्रक्रियेमुळे वाया जाणारे पाणी शून्य टक्क्यावर

नायडू एसटीपी प्लांटमध्ये ऑनलाईन पीएच, बीओडी, सीओडी, तापमान प्रवाहाची सद्यस्थितीची माहिती इ. सतत देखरेख यंत्रणा उभारणारी राज्यातील पहिली महापालिका आहे.

पुण्याची “ग्रीन सिटी” ही ओळख अधिक ठळक करण्यासाठी टेकड्यांवरील वृक्षलागवडीवर भर






# सन २०२१-२२ च्या प्रमुख बाबी (३/५)

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत आजूबाजूची २३ गावे विलीन करण्यास राज्य सरकारची मान्यता

नळ स्टॉप चौकातील दुहेरी उड्डाणपुलाचे काम पूर्ण लवकरच नागरीकांना वापरासाठी खुला करण्याचे नियोजन




| SR.NO. | VILLAGE NAME |
|---|---|
| 1 | MAHALUNGE |
| 2 | SUS |
| 3 | BAVDHAN BK |
| 4 | KIRKITWADI |
| 5 | PISOLI |
| 6 | KONDHWA DHAVDE |
| 7 | KOPRE |
| 8 | NANDED |
| 9 | KHADAKWASLA |
| 10 | MANJERI BK |
| 11 | NARHE |
| 12 | HOLKARWADI |
| 13 | AUTADE HANDEWADI |
| 14 | WADACHIWADI |
| 15 | SHEWALEWADI |
| 16 | NANDOSHI |
| 17 | SANASNAGAR |
| 18 | MANGDEWADI |
| 19 | BHILAREWADI |
| 20 | GUJARWADI |
| 21 | JAMBULWADI |
| 22 | KOLEWADI |
| 23 | WAGHOLI |



# कोविड-19 संसर्गाचा प्रादुर्भाव नियंत्रणासाठी केलेले प्रतिबंधात्मक उपाय (४/५)

पुणे महानगरपालिकेने कोरोना संकटाचा वाढता वेग पाहता आरोग्य यंत्रणा मजबूत करत 4 नवीन रुग्णालये बांधली आणि 5 रुग्णालये कोविडसाठी सज्ज केली.

तिसऱ्या लाटेसाठी पुणे मनपाने बाणेर येथे ६२ आयसीयु बेड्ससह २०९ खाटांचे रुग्णालय उभारले आणि लहान मुलांसाठी राजीवगांधी रूग्णालयात व मगर हॉस्पिटल व्यवस्था करण्यात आली

कोरोनाच्या तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने एकूण १४००० एल.पी.एम.उत्पादन क्षमतेचे १६ OGP आणि १७३ KL उत्पादन क्षमतेचे १२ लिक्विड ऑक्सिजन साठवणूक टँक द्वारे ऑक्सिजनची उपलब्धता सुनिश्चित केली

"व्हॅक्सीन ऑन व्हील" उपक्रमा अंतर्गत विविध घटकातील लाभार्थ्यांना २८०० कॅम्प द्वारे ४.३५ लक्ष कोरोना प्रतिबंधक लस देण्यात आली

१०००० पेक्षा अधिक परदेशात शिक्षणासाठी/कामासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी "लसीकरण ड्राईव्ह"





# सन २०२१-२२ च्या प्रमुख उपलब्धी आणि ठळक बाबी (५/५)

पुणे मनपास मिळकत कराच्या उत्पन्नात गेल्या चार वर्षात भरघोस वाढ - महाराष्ट्रात पहिला क्रमांक

पंडित दिनदयाळ उपाध्याय अपघात विमा योजनेचे पुणे मनपा करदात्यांपैकी नऊ लाख कुटुंबाना संरक्षण

अनधिकृत नळजोड अधिकृत करण्यासाठी “अभय योजना” जाहीर (निवासी,व्यावसायिक आस्थापना तसेच चाळ विभाग, अनधिकृत झोपडपट्टी, गावठाण, गुंठेवारीनुसारची घरे यांसाठी ही योजना लागू)

# रस्ते विकसन (पथ) (१/२)

(भांडवली तरतूद र.रु.५१४.५२ कोटी+महसुली तरतूद र.रु.३४२.०४ कोटी = र.रु.८५६.५६ कोटी)

पुणे स्ट्रीट प्रोग्राम अंतर्गत ३ रस्त्यांचे सुमारे ३५ कि.मी.लांबीचे रस्ते विकसीत केले असून ५ रस्ते नव्याने डिझाईन करून पुनर्रचित करणे प्रस्तावित

नागरीकांना शहरामध्ये विविध ठिकाणी ई-दुचाकी रेंटवर तसेच खाजगी ई दुचाकीसाठी चार्जिंग स्टेशन उपलब्ध होणार आहेत.

या मधून मिळणाऱ्या उत्पन्नाचा काही भाग तसेच चार्जिंग स्टेशनचे भुईभाडे मनपास मिळणे प्रस्तावित आहे





# रस्ते विकसन (२/२)

एकात्मिक सायकल योजना अंतर्गत शहरात ९५ कि.मी.लांबीचा सायकल ट्रॅक असून नवीन १० कि.मी.लांबीचा सायकल ट्रॅक नव्याने प्रस्तावित

बंडगार्डन ते खराडी दरम्यान पीपीपी मॉडेलवर 30 मीटर रुंदीचा उन्नत मार्ग विकसीत करण्याचे नियोजन

आंबिल ओढ्यावरील २१ पुलांपैकी पूर्ण झालेले १० पूल वगळता नवीन ११ पुलांची कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.





# वाहतूक नियोजन व प्रकल्प/उड्डाण पूल प्रकल्प (भांडवली तरतूद र.रु.६६९.८०कोटी)

या वर्षात ६ उड्डाण पूल, १ नदीवरचा पूल, १ बोगदा प्रस्तावित

विश्रांतवाडी,सिंहगड रोड, खराडी बायपास चौक, ॲम्ब्रोसिया रिसॉर्ट ते बावधन, करिश्मा चौक ते कर्वे पुतळा आणि शास्त्रीनगर चौक नगररोड येथे उड्डाणपूल/ग्रेडसेपरेटर करणेचे नियोजन

सनसिटी, सिंहगडरोड ते कर्वेनगर नदीवर पूल बांधणेचे नियोजन

पाषाण-पंचवटी ते कोथरूडला जोडणारा बोगदा करणे





# सार्वजनिक वाहतूक/ पुणे महानगर परिवहन महामंडळ लि (तरतूद र.रु. ४३३.१९ कोटी)

ताफ्यात एकूण २२३९ बसेस सेवेत आहेत.
(ई-बस-२९०,सीएनजी बस-१६६२ व डिझेल बस-२८७)



PMPML ई- बसेससाठी 15 नवीन चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात येणार





PMPML PPP तत्वावर 30 डेपो विकसित करणार




सार्वजनिक वाहतूक व्यवस्था वेगवान होण्यासाठी पीएमपीएमएलचे मोबाईल ॲप संपूर्णत: नव्या रुपात प्रवाशांसाठी उपलब्ध होणार


# नगर नियोजन

पुणे शहराचा जुनी हद्द व समाविष्ट २३ गावांचा विकास आराखड्यानुसार रस्त्याची हद्द आरक्षणे आखणी निश्चित करणेबाबत तसेच प्रत्यक्ष जागेवर डी.पी.रस्त्यांचे मार्किंग करणे .




| SR.NO. | VILLAGE NAME |
|---|---|
| 1 | MAHALUNGE |
| 2 | SUS |
| 3 | BAVDHAN BK |
| 4 | KIRKITWADI |
| 5 | PISOLI |
| 6 | KONDHWA DHAVDE |
| 7 | KOPRE |
| 8 | NANDED |
| 9 | KHADAKWASLA |
| 10 | MANJERI BK |
| 11 | NARHE |
| 12 | HOLKARWADI |
| 13 | AUTADE HANDEWADI |
| 14 | WADACHIWADI |
| 15 | SHEWALEWADI |
| 16 | NANDOSHI |
| 17 | SANASNAGAR |
| 18 | MANGDEWADI |
| 19 | BHILAREWADI |
| 20 | GUJARWADI |
| 21 | JAMBULWADI |
| 22 | KOLEWADI |
| 23 | WAGHOLI |

## Town Planning Schemes










उरुळी- फुरसुंगी या गावांची नियोजनबद्ध विकासासाठी नगर नियोजन आराखड्याचे (टी.पी स्कीम) काम प्रगतीपथावर

**वैशिष्टे**

- प्रत्येक जागामालकाला जमिनीच्या स्वरूपात योग्य मोबदला
- रस्ते,पाणीपुरवठा सांडपाणी व्यवस्था ई.मुलभूत सुविधा विकसीत केल्या जाणार
- इतर आवश्यक व समाजोपयोगी आरक्षणे ठेवली

# नदी पुनरुज्जीवन प्रकल्प

(तरतूद र.रु.२७५ कोटी)


## मुळा, मुठा, मुळा-मुठा या ४४.४ कि.मी.नद्यांचे पुनरुज्जीवन प्रकल्प प्रस्तावित

- मुळा- मुठा नदीच्या पुनरुज्जीवन प्रकल्पाचे भूमिपूजन संपन्न

- मुळा- मुठा नदीच्या विकासासाठी **संगमवाडी ते बंडगार्डन पुला** दरम्यानच्या ३.७ कि.मी पहिल्या टप्प्यातील कामाची अंमलबजावणी करणे

- संगमघाटावरील पुरातन वास्तूला जतन करून परीसराचे अनुरूप संवर्धन आणि सुशोभिकरण करणे

- दुसरा टप्प्यात **५.३ कि.मी.चा बंड गार्डन पूल ते मुंढवा** (स्ट्रेच -१० व ११) व बंड गार्डन पूल ते मुंढवा (उजव्या बाजूस) नदीच्या कडेने रस्ता **पीपीपी धर्तीवर** क्रेडीट नोट मोबदल्याच्या स्वरूपात कामाची अंमलबजावणी करणे








* Length calculated considering either bank of the river

# राष्ट्रीय नदी संवर्धन योजने अंतर्गत पुणे शहरातील मुळा-मुठा नदी प्रदुषण नियंत्रण करणे

(तरतूद र.रु. २९५ कोटी)

पुणे शहरात विविध ११ ठिकाणी ३९६ एम.एल.डी. क्षमतेच्या मैलापाणी शुद्धीकरण केंद्रे व ५५ कि.मी.लांबीच्या मुख्य मलवाहिनी विकसन कामाची अंमलबजावणी करणे
















# पाणीपुरवठा


(भांडवली तरतूद र.रु. ७२१.२७ कोटी + महसुली तरतूद र.रु. ६९४.६२ कोटी = र.रु. १४१५.८९कोटी)

## समान पाणी वाटप योजनेचा तपशील

| अ.क्र | घटक | उद्दिष्ट | पूर्ण | प्रस्तावित (२०२२-२३) |
|---|---|---|---|---|
| १ | जलवाहिनी टाकणे | १८०० कि.मी | ६०० कि.मी | ४०० कि.मी. |
| | | | | |
| २ | जलमापक बसविणे | ३.१५ लक्ष | ०.५४ लक्ष | १.५ लक्ष |
| | | | | |
| ३ | साठवण टाक्या (अमृत योजने अंतर्गत) | ८२ | ३६ | २९ |










# मलनि:सारण (भांडवली तरतूद र.रु.६७२.९७ कोटी + महसुली तरतूद र.रु. २५२.३३कोटी = र.रु ९२५.३० कोटी)

सिवरेज मास्टरप्लॅननुसार सन २०१७ पर्यंत अपुऱ्या पडणाऱ्या अंदाजे १३५ कि.मी.लांबी पैकी ४० कि.मी.लांबीच्या विविध व्यासाच्या मलवाहिन्याचे काम प्रस्तावित





समाविष्ट ११+२३ गावांमध्ये मोठ्या व्यासाच्या ट्रंक लाईन व मलवाहिन्याचे नेटवर्क करणे प्रस्तावित

# आरोग्य विभाग

(महसुली तरतूद र.रु. ४०९.२१ कोटी)

महानगरपालिकेचे “भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी वैद्यकीय महाविद्यालय”उभारणे संबंधित विविध प्रकारची कामे प्रगतीपथावर







पुण्यात भारतरत्न नानाजी देशमुख कर्करोग रुग्णालय अत्याधुनिक सोयी-सुविधांनी करण्याचे नियोजन

महापालिकेतर्फे कोरोनाच्या संकटांचा वेग विचारात घेऊन आरोग्य यंत्रणा सुदृढ करण्यात आली

# उद्यान व पर्यावरण

भांडवली तरतूद र.रु ५१.०० कोटी+महसुली तरतूद र.रु. ५८.८५ कोटी एकूण र.रु.१०९.८५कोटी )

माझी वसुंधरा अभियान :-पंचतत्वानुसार (पृथ्वी, वायु,जल,अग्नी,आकाश) पुणे शहराच्या पर्यावरणाचे रक्षण व संवर्धन सतत करणे




पु.ल.देशपांडे उद्यान,पुणे पेठ पर्वती स.न.१२१,१२२,येथे फेज ३ मध्ये कलाग्राम विकसीत करणे



स्व.राजीव गांधी प्राणी संग्रहालय, कात्रज मास्टर प्लॅननुसार विकसीत करणे

# घनकचरा व्यवस्थापन(१/३)

(भांडवली तरतूद र.रु. १२८.०० कोटी + महसुली तरतूद र.रु. ७००.७७ कोटी =र रु.८२८.७७ कोटी)

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर कचऱ्यापासून उर्जा निर्मितीबरोबरच आपल्या कचऱ्यावर आपणच प्रक्रिया करून शून्य कचरा मिशन साध्य करण्याचे उद्दिष्ट साध्य



शहराच्या ४ ठिकाणामध्ये ओला कचरा प्रक्रिया द्वारे ब्रिकेट्स बनविण्याचा प्रकल्प डिझाईन,बिल्ड,ओन,ऑपरेट तत्वावर उभारण्याचे नियोजन



# घनकचरा व्यवस्थापन(२/३)

नवीन समाविष्ट २३ गावातील अस्तित्वातील जागा ताब्यात घेऊन कचरा हस्तांतरण केंद्र /कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणेचे नियोजन व पूर्वीपासून साठविण्यात आलेल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे



Waste suction machine

एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन (इंट्रीगेटड सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट) अंतर्गत घनकचरा विभाग व मोटार वाहन विभाग यांच्याकडील सर्व प्रकल्प, वाहने, मनुष्यबळ याचे संगणकीय एकत्रीकरणाचे काम करणे



सर्व कचरा रॅम्पवरून सुका कचरा १५० मे टन प्रतिदिन क्षमतेने सिमेंट कंपन्यांमध्ये इंधनासाठी वापरण्यासाठी निविदा प्रक्रिया प्रगती पथावर

# घनकचरा व्यवस्थापन(३/३)

राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम (NCAP) योजनांतर्गत शहरातील रस्त्यांची धूळ न उडवता यांत्रिकी पद्धतीद्वारे स्वच्छता करण्यावर भर

शहरातील सर्व प्रभागातून सर्व प्रकारचे गार्डन वेस्ट संकलन करणे, वाहतूक करणे व प्रक्रिया करणे

कचरा हस्तांतरण करणेसाठी सद्यस्थिती ७ ठिकाणी रॅम्प उभारण्यात आले







# माहिती व तंत्रज्ञान(१/२)

(भांडवली तरतूद र.रु.४७.२०कोटी + महसुली तरतूद र.रु.३९.६२कोटी = र.रु.८६.८२कोटी)

Integrated Command & Control Center (ICCC) मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये प्रस्तावित

शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेची नागरीकांना ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे देण्याचे नियोजन

नवीन अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून Property Tax सॉफ्टवेअरचे अद्ययावतीकरण करणे

अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा Artificial Intelligence व Data Analytics चा प्रभावी वापर

# माहिती व तंत्रज्ञान (२/२)

पुणे मनपा मार्फत नागरिकांना पाण्याची सेवा,आरोग्य सेवा, अग्निशमन आणि आकाश चिन्ह परवाना बाबतच्या सेवा ऑनलाइन पद्धतीने प्रदान करणेचे नियोजन

मृतांच्या नातेवाइकांना अंत्यसंस्कार पास आणि मृत्यू प्रमाणपत्र लवकरच किंवा ऑनलाइन द्वारे पास देण्याची सुविधा

महापालिकेच्या कार्यपद्धतीमध्ये पारदर्शकता आणि गतिमानता आणण्याच्या दृष्टीने डिजिटल माध्यमाच्या वापरावर भर



# प्रधानमंत्री आवास योजना

(तरतूद र.रु. १२० कोटी)

प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना हडपसर,खराडी व वडगाव खुर्द येथे एकूण ५ ठिकाणी २९१८ सदनिकांचे बांधकाम सुरु आणि १७२९ वाटप करण्यात आले उर्वरित घरांचे वाटप करण्याचे काम नियोजित

खाजगी भागीदारी तत्वावर बाणेर, बालेवाडी, कोंढवा बु., धानोरी, महम्मदवाडी, फुरसुंगी (गायरान) या ठिकाणी सदनिका बांधण्याचा प्रकल्प राबविण्याचे नियोजन












# भवन रचना

(भांडवली तरतूद र.रु. ३०४.९० कोटी +महसुली तरतूद र.रु.३९.८५कोटी = र.रु.३४४.७५ कोटी)

महापालिकेच्या कर्मचाऱ्याना हक्काचे आणि सुरक्षित घर देण्यासाठी वसाहतीच्या पुनर्विकासाचे काम प्रगतीपथावर (घोरपडे पेठ,साने गुरुजीनगर,राजेंद्रनगर, गोखलेनगर, कसबा पेठ, शिवाजीनगर, बिबवेवाडी)

घोले रोड येथे नगर वाचनालय (City Library) बांधण्याचे नियोजन

कोथरूड येथे Exhibition Centre ची उभारणी करणे

बालगंधर्व रंगमंदिर पुनर्निर्माण करणेचे नियोजन

पुणे शहरातील मुलींची पहिली शाळा (भिडेवाडा) शिवाजी रोड इमारतीचे पुनर्निर्माण नियोजित

संगमवाडी येथे क्रांतीवीर लहूजी वस्ताद यांचे स्मारकाचे काम शासनाचे मदतीने करण्यात येणार

# सी.एस.आर.माध्यम

सी.एस.आर माध्यमातून स्वच्छता, आरोग्य सुविधा आणि शिक्षण या क्षेत्रांसाठी कामे करण्यावर भर देणे

पुणे महानगरपालिका व स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने ११ लाईट हाऊस प्रकल्पामार्फत दुर्बल घटकांतर्गत स्किल डेव्हलपमेंट प्रोग्राम द्वारे रोजगाराची संधी उपलब्ध होतात

पुणे भारतातील पहिले Infant, Toddler, Caregiver-(ITC) Friendly City बनवण्यासाठी, URBAN 95 कार्यक्रम राबविणे






# महिला बाल कल्याण योजना

- महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी विविध योजना प्रस्तावित
- लाडकी लेक मुलगी दत्तक योजना
- महाविद्यालयीन तरुणीसाठी कमवा आणि शिका योजना
- १५ ते २५ वर्षे वयोगटातील तरुणींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण
- उद्योजकता विकास शिबीर आयोजित करणे
- Gender Responsibility अभ्यासगट तयार करणे व शहर पातळीवर महिलांच्या सुरक्षिततेसाठी उपाययोजना करणे
- सार्वजनिक ठिकाणी महिलांच्या सुरक्षिततेसाठी safety mapping व safety audit करणे







# विद्युत विभाग

**भांडवली तरतूद र.रु १६.२१-कोटी+महसुली तरतूद र.रु.२८३.१७कोटी =एकूण र.रु.-२९९.३८ कोटी)**

केंद्र शासनाच्या धोरणानुसार एल.ई.डी दिवे बसविणे (EESL) अंतर्गत ४७००० नग एल.ई.डी दिवे बसविणेत येणार आहे.

वीज वापरापोटी येणाऱ्या वीज बिलामध्ये बचत करणेच्या दृष्टीने EESL या कंपनी अंतर्गत असलेल्या CESL बरोबर SPV स्थापन करून वीज खरेदी करणे

स्वस्त वीज खरेदीसाठी महापालिकेमार्फत स्वमालकीचा पहिला सौरउर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन

नव्याने समाविष्ट गावामध्ये प्रकाश व्यवस्था सक्षम करणे

नदीवरील पुलांवर सोलर युनिट बसवून वीज निर्मिती करण्याचे प्रकल्प राबविणे





Hood & Ducting



# प्राथमिक, माध्यमिक व तांत्रिक शिक्षणासाठी आधुनिक सुविधा

**(प्राथमिक र.रु ४९५.८८कोटी, माध्यमिक व तांत्रिक र.रु.७५.८१ कोटी)**

NSQF (National Skill Qualification Framework) व राज्य शासनाचे उद्दिष्टनुसार “Model ITI” प्रमाणे पुणे महानगरपालिका संचलित श्री.छत्रपती शिवाजी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) चे अद्ययावतीकरण व नूतनीकरण करण्याचे नियोजन (बहुमजली इमारत बांधण्याचे नियोजन आणि अत्याधुनिक यंत्र-सामुग्री बसविणे)

माध्यमिक शाळांमधील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे, विद्यार्थ्यांची गळती शोधून त्यावर प्रभावी उपाययोजना करणेकामी नव्याने गुणवत्ता वाढ व संशोधन कक्ष स्थापित करणे प्रस्तावित








# हेरीटेज सेल

(भांडवली तरतूद र.रु.७.२५ कोटी)

ऐतिहासिक वारसा स्थळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यात येणार

पुण्याचे वैशिष्ट्य सांगणाऱ्या वास्तूंचा पुनर्विकास करण्याचे नियोजन

ऐतिहासिक लालमहालामध्ये संग्राहालय उभारणे (महाराष्ट्रातील सर्व किल्याची माहिती आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील महत्वांच्या घटना प्रदर्शित करणे)

शहराला ऐतिहासिक ठिकाणांचे जतन, संवर्धन व सुशोभीकरण करणे प्रगतीपथावर



# मागील चार वर्षाचा अंदाजपत्रकाचा संक्षिप्त आढावा

# मागील ४ वर्षांचा संक्षिप्त आढावा : जमा बाजू

(आकडे रुपये कोटीत )

| जमा बाजू | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर | डिसेंबर २०२० अखेर | जानेवारी २०२२ अखेर |
|---|---|---|---|---|
| स्थानिक संस्था कर | ७३.४३ | १२४.१७ | २४.८४ | १३०.३६ |
| वस्तू आणि सेवा कर (GST) | ११७९.५४ | १२७६.९२ | १३७९.०७ | १७३१.५२ |
| मिळकत कर | ७५०.४१ | ८२६.६१ | ९९३.६२ | ११५४.२८ |
| पाणीपट्टी | १९७.४३ | १९७.४९ | २०५.३४ | २३५.६७ |
| बांधकाम परवानगी व विकास शुल्क | ५५९.८७ | ५८८.९७ | २७४.९३ | १५७१.५० |
| इतर जमा | १९४.४७ | २०५.९९ | १५७.७२ | ४२७.२९ |
| स्मार्ट सिटी व अमृत अभियान | ०.३० | - | २.०६ | - |
| शासकीय अनुदान | ९९.०२ | १२२.३६ | ६९.९० | १४७.९३ |
| कर्ज रोखे | - | - | - | - |
| प्रधानमंत्री आवास योजना | ०.०३ | - | - | ४५.११ |
| **एकूण रक्कम रु. कोटीत** | ३०५४.५० | ३३४२.५१ | ३१०७.४८ | ५४४३.६५ |

# मागील ४ वर्षांचा संक्षिप्त आढावा : खर्च बाजू

(आकडे रुपये कोटीत )

| खर्च बाजू | डिसेंबर २०१८ अखेर | डिसेंबर २०१९ अखेर | डिसेंबर २०२० अखेर | जानेवारी २०२२ अखेर |
|---|---|---|---|---|
| सेवकवर्ग खर्च | १०८१.०५ | ११२६.६८ | ११३१.४४ | १४९३.६४ |
| वीज खर्च व दुरुस्ती | १४९.८६ | १६९.७० | १६६.२१ | २१३.४४ |
| पाणी खर्च | ५६.९४ | ५१.३७ | ३४.५३ | ३८.१५ |
| कर्ज परतफेड, व्याज व घसारा | २१.०६ | २९.६१ | ३०.३४ | ३२.६४ |
| औषधे, पेट्रोल व डिझेल | ७४.४२ | १०१.८१ | १२०.४२ | १२६.६६ |
| देखभाल दुरुस्ती व इतरखर्च | ३७६.६५ | ४१५.६२ | ५२९.१८ | ७८२.८१ |
| वार्डस्तरीय कामे | ४.४२ | ३.६० | ३.६१ | १०.२६ |
| क्षेत्रीय कार्यालयाने करावयाची कामे (नॉन प्लॅन) | ५.८६ | १२.७० | २.०४ | ०.३३ |
| भांडवली व विकासाची कामे | ४३५.०१ | ५३७.८३ | ८०४.८२ | ५५२.२६ |
| स्मार्ट सिटी व अमृत योजना | ३२.९१ | १५.६६ | २५.८० | ८०.५४ |
| **एकूण रक्कम रुपये कोटीत** | **२२३८.१८** | **२४६४.५८** | **२८४८.३९** | **३३३०.७३** |

# सन २०२२-२३ चे वार्षिक अंदाज पत्रक


# सन २०२२-२३ आर्थिक वर्षासाठी जमाखर्चाचा अंदाज

## सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाच्या जमाखर्चाचा अंदाज पुढीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे


(आकडे रुपये कोटीत )

| जमा बाजू | | खर्च बाजू | |
|---|---|---|---|
| वर्षारंभीची शिल्लक | ०.०२ | सेवकवर्ग खर्च | २६३४.८४ |
| स्थनिक संस्था कर | ३३०.९७ | वीज खर्च व दुरुस्ती | २८३.१७ |
| वस्तू आणि सेवा कर(GST) | २१४४.७५ | पाणी खर्च | १०६.९२ |
| मिळकतकर | २१६०.५४ | कर्ज परत फेड, व्याज व घसारा | १४९.४७ |
| बांधकाम परवानगी व शहर विकास चार्जेस | १४००.०१ | औषधे, पेट्रोल/ डिझेल खर्च | १८५.३९ |
| पाणी पट्टी | ५०६.०० | देखभाल दुरुस्ती / इतर खर्च | १४०६.९३ |
| शासकीय अनुदान | ५१६.३७ | वॉर्डस्तरीय कामे | ३४.८० |
| इतर जमा | ८३३.३४ | क्षेत्रिय कार्यालयाने करावयाची कामे | ८०.०२ |
| कर्ज /कर्ज रोखे | ५००.०० | भांडवली व विकासाची कामे | ३७१०.४४ |
| प्रधानमंत्री आवास योजना | २००.०० | वर्षाअखेरची शिल्लक | ०.०२ |
| एकूण | ८५९२.०० | एकूण | ८५९२.०० |

# रुपया असा येणार - सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक (र.रु ८५९२.०० कोटी)



# रुपया असा जाणार - सन २०२२-२३ चे अंदाजपत्रक (र.रु ८५९२.०० कोटी)



हे अंदाजपत्रक सादर करताना

आपणा सर्वांकडून

मिळालेल्या बहुमोल

सहकार्याबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार